# : जाहिरात ::

**विधानमंडळ सचिवालयातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ (CPA) या कक्षामार्फत हाताळण्यात येणाऱ्या विवक्षित कामासाठी एमपॅनेलमेंटद्वारे (Empanelment) करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता खाली नमूद अर्हता व पात्रता, अनुभव इत्यादींची पूर्तता करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**I) शैक्षणिक अर्हता :-** उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी धारण करणे आवश्यक आहे.

**II) इतर अर्हता :-**

(अ) सेवानिवृत्त अधिकारी सह सचिव दर्जाचा असावा.

(ब) सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

(क) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

(ड) अर्ज सादर करणारा अधिकारी ज्या दिनांकास अर्ज सादर करेल त्या दिनांकास तो सेवानिवृत्त झालेला असला पाहिजे.

**III) अनुभव :-**

(अ) उमेदवाराने कमीत कमी ५ अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेंचे काम हाताळलेले असावे.

(ब) उमेदवारास कमीत कमी सीपीए कक्षाने आयोजित केलेल्या ५ परदेश दौऱ्याचा अनुभव असावा.

(क) उमेदवारास कमीतकमी ५ वर्षे सीपीए कक्षातील कामाचा अनुभव असावा.

..२/-

(ड) उमेदवारास किमान १० देशांतील राजदूतावास/वाणिज्य दूतावास यांचेशी संपर्क साधून परिषदा, शिष्टमंडळ दौरे याकरिता पत्रव्यवहार केल्याचा अनुभव असावा.

**IV) वयोमर्यादा :-** करार पद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**V) इतर माहिती :-**

**१) नियुक्तीचा कालावधी :-** निवड झालेल्या उमेदवाराची प्रथम एक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल.

**२) निवड प्रक्रिया :-** पात्र अर्जांची संख्या विचारात घेऊन उमेदवाराची निवड अर्जांची छाननी करुन पात्रतेच्या व गुणवत्तेच्या (Eligibility & Merit) निकषांवर करण्यात येईल.

**३) इतर :-** उमेदवारांकडून प्राप्त होणारा एखादा अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

**४) पारिश्रमिक :-** कंत्राटी पद्धतीने नियुक्ती होणाऱ्या सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांचे पारिश्रमिक दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहिल.

**५) नियुक्तीच्या कालावधीतील अटी व शर्ती :-**

अ) करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील व सदरहू व्यक्तीस याबाबत बंधपत्र / हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

ब) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहिल व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

..३/-

पात्र सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी सोबतच्या नमुन्यात संपूर्ण तपशीलासह आपले अर्ज अवर सचिव (आस्थापना), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर **जाहिरातीच्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाने (By Regd.AD) अथवा शीघ्र टपालाने (By Speed Post) सादर करावेत. फक्त नोंदणीकृत टपालाद्वारे अथवा शीघ्र टपालाद्वारे व विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांचाच विचार केला जाईल.**

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक : फेब्रुवारी, २०२३**

पृ. २५/वि.वि

# :: अर्जाचा नमुना ::

विधानमंडळ सचिवालयातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ (CPA) या कक्षामार्फत हाताळण्यात येणाऱ्या विवक्षित कामासाठी एमपॅनेलमेंटद्वारे (Empanelment) सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्तीकरिता अर्ज.

| उमेदवाराने अलीकडील काळीतील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

**१) अर्जदाराचे संपूर्ण नाव (देवनागरी लिपित) :-**

**(इंग्रजीत) :-**

**२) अर्जदाराचा संपूर्ण कायमचा पत्ता :-**

**३) अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-**

**४) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-**

**५) भ्रमणध्वनी क्रमांक :-**

**६) जन्म दिनांक व वय :-**

**७) शैक्षणिक अर्हता :-**

**८) आधार कार्ड क्रमांक :-**

**९) अनुभव :-**

उपरोक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**(अर्जदाराची स्वाक्षरी)**